राज्यातील आदिवासी विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या मान्यता प्राप्त व अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरीबाबत...

**प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीचे अधिकारामध्ये सुधारणा करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांक : आविवि २०१५/प्र.क्र.२६०/का-११

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०१ डिसेंबर, २०१५.

**वाचा :**

१) शासन निर्णय क्रमांकः क्र.वैदयक १४९८/प्र.क्र.५६/९८/का-१९ दि. २८.९.१९९९.
२) शासन निर्णय क्रमांकः शालेय शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-१०१२/(१५/१२)/माशि-५, दि. ३ फेब्रुवारी, २०१२
३) शासन निर्णय क्रमांकः सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.वैखप्र-२०१५/प्र.क्र.८२/२०१५/राकावि-२, दि. २४ ऑगस्ट,२०१५
४) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांकः वैखप्र : १०१२/(५२२/१५) टीएनटी-५ दि. १८/९/२०१५.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या मान्यता प्राप्त व अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ मधील तरतूदींच्या अधीन राहून आकस्मिक उद्भवणाऱ्या २७ आजारांवर रुग्णालयात घेतलेल्या उपचारांवरील तसेच ५ गंभीर आजारावर शासनाने संपूर्ण खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील वैद्यकीय खर्चाच्या प्रत्येक प्रकरणी रुपये १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख फक्त) च्या मर्यादेत प्रतिपूर्तीस मंजूरी देण्याचे अधिकार कार्यालय प्रमुखांना आहेत. या मर्यादेवरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची प्रकरणे संबंधित प्रशासकीय विभागाकडे सादर केली जातात. सद्य:स्थितीत औषधाच्या किंमतीत व उपचार पध्दतीवरील खर्चामध्ये झालेली वाढ तसेच अशी प्रकरणे निकाली काढण्यास लागणारा कालावधी इत्यादीचा विचार करुन शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यावर होणाऱ्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांना मंजूरी देण्याच्या वित्तीय अधिकारात संदर्भाधीन दिनांक २४ ऑगस्ट,२०१५ च्या शासन निर्णयान्वये बदल करण्यात आला आहे. त्यास अनुलक्षून वर नमूद केलेल्या संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वैद्यकीय देयकास मंजूरी देण्यासाठी वित्तीय अधिकारामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

संदर्भाधीन दिनांक २८ सप्टेंबर, १९९९ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळावेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतूदीच्या अधीन राहून वित्तीय अधिकारात सार्वजनिक आरोग्य विभागाने केलेल्या सुधारणेप्रमाणे आदिवासी

विभागाअंतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या मान्यताप्राप्त अनुदानित आश्रमशाळांतील पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

| अधिकारी | पूवीचे अधिकार | सुधारित अधिकार |
|---|---|---|
| अप्पर आयुक्त ठाणे/नाशिक/नागपूर/अमरावती | रुपये १,००,०००/- | रुपये २,००,०००/- पर्यंत |

२. रुपये २,००,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम,१९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतूदीच्या अधीन राहून मंजूरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना राहतील.

३. वर नमूद केल्याप्रमाणे “विभाग प्रमुख” स्तरावर रुपये २,००,०००/- पर्यन्तची वैद्यकीय देयकांना अप्पर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी मंजूरी देताना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतूदीची काटेकोरपणे तपासावी व नंतरच मंजूरी देण्यात यावी. यावर होणारा खर्च हा या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन ज्या लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागविला जातो त्याखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय या निर्णयाच्या दिनांकाला प्रलंबित प्रकरणांनाही लागू राहील.

५. सदर शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने वित्त विभागाच्या सहमतीने काढलेल्या संदर्भाधीन शासन निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२०२१२५४५६४४२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2015.12.02 12:51:06 +05'30'

**( सु.ना. शिंदे )**

उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
२. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/नागपूर/अमरावती
३. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
४. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

५. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

६. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

८. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

९. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०.मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

११.मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

१२.मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

१३.सर्व सह सचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग.

१४.निवड नस्ती, (का.१२), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.